# आपला महाराष्ट्र

## चराऊ कुरणे आणि संकटग्रस्त पशु पालक

पैसे देणारी दुभती जनावरे सोडली तर आता पशुपालन फारसे कोणी करताना दिसत नाही पूर्वी बैलांच्या भरवशावर शेती करणारे खेड्यातील शेतकरी देशी गाय आणि एखादी म्हैस पाळत असत.पण त्यांनी ट्रॅक्टर टिलरची शेती सुरू केली तेव्हापासून ती जनावरे गायब झाली.आता ज्यांचा शेतीशी काहीच संबंध नाही ते गोशाळा काढतात.त्यांची गाय धार्मिक असून तिचा कृषिसंस्कृतिशी काहीच संबंध नाही.कृषि संस्कृती जगणारे पशु पालना संबंधी अडचणीचा मोठा पाढा वाचतात.त्यात चारा हा मुख्य भाग आहे.चारा उपलब्ध नसल्याने जनावरे पाळता येत नाहीत असा लोक युक्तिवाद करतात.पण माणसांना अन्न मिळते जनावरांना मात्र चारा मिळत नाही.हे अजब आहे.

पौष्टीक घटक मिळविण्याचा शाकाहारी साधन मानले जाणारे दूध हळूहळू कमी होत चालले आहे. याचे कारण म्हणजे दुभत्या जनावरांसाठी चाऱ्याची कमतरता. जंगलांचे सरकारीकरण आणि शेतीच्या यांत्रिकीकरणामुळे जवळजवळ प्रत्येक गावात असलेली पारंपरिक चराऊ कुरणे नष्ट झाली आहेत . पशुखाद्याचे नैसर्गिक स्रोत असलेली जंगलेही पशुपालकांच्या हातातून हिरावून घेतली गेली आहेत. ही बेजबादारपणे होणारी नासधूस का होत आहे या प्रश्नाचे उत्तर म्हणजे धोरणकर्तेच बेजबाबदार आहेत.संयुक्त राष्ट्रसंघाने २०२६ हे वर्ष चराऊ कुरणे आणि पशुपालक वर्ष म्हणून घोषित केले आहे.जमिनींचे बाजारीकरण झाल्याने जागतिक पातळीवर चिंता निर्माण झाली.म्हणून वर्ष साजरे करण्याची वेळ आली.

जमिनीच्या वापरातील बदलामुळे या जमिनींचे क्षेत्रफळ कमी होत आहे.शहरीकरणामुळे बिनशेती चे प्रमाण वाढले आहे .अतिचराई आणि चराऊ जमिनींच्या अयोग्य वापरामुळे त्यांची सुपीकताही कमी होत आहे. गवताळ प्रदेश, झुडपी जंगले, वाळवंटे, पर्वतीय चराऊ कुरणे, मोकळी जंगले आणि कृषी–वनीकरण क्षेत्रे याच प्रकारात मोडतात.

जगाच्या एकूण भूभागापैकी सुमारे ५४ टक्के भूभाग कोणत्या ना कोणत्या प्रकारच्या चराऊ जमिनींमध्ये येतो. त्यापैकी ७८ टक्के क्षेत्र कोरड्या प्रदेशात आहे. जगातील एक–तृतीयांश जैवविविधता या क्षेत्रांवर अवलंबून आहे. जगातील अन्नउत्पादनापैकी सुमारे १६ टक्के उत्पादन या प्रदेशांतून मिळते. चराऊ जमिनी मातीला पोषक द्रव्ये पुरवण्याबरोबरच कार्बनचे प्रमाण नियंत्रित करणे, पर्यावरण पर्यटन आणि मनोरंजन यामध्येही महत्त्वाची भूमिका बजावतात. मात्र, एकूण चराऊ क्षेत्रापैकी सुमारे ५० टक्के क्षेत्र नापीक होण्याच्या मार्गावर आहे.

भारतात चराऊ जमिनींचे क्षेत्रफळ सुमारे १२१० लाख हेक्टर आहे. त्यापैकी सुमारे १००० लाख हेक्टर क्षेत्र चांगल्या स्थितीत नाही आणि ते आपल्या पूर्ण क्षमतेने उपयोगी भूमिका बजावण्यास असमर्थ आहे. परिणामी पशुपालक समुदाय हळूहळू उपेक्षित गटात मोडतात. आणि सरकारी धोरणांमध्येही त्यांच्या हितांकडे योग्य लक्ष दिले जात नाही.

खनिज उत्खनन आणि ऊर्जा प्रकल्पांमुळे या क्षेत्रांमध्ये पशुपालकांचा प्रवेशही मर्यादित होत आहे. मात्र देशातील पशुपालकांचा चराऊ कुरणांमध्ये चारण्याचा अधिकार आहे. देशातील सुमारे दोन–तृतीयांश ग्रामीण लोकसंख्येच्या उपजीविकेला पशुपालनाचा आधार आहे. भारतातील एकूण पशुधनाची संख्या सुमारे ५३ कोटी ६१ लाख आहे. त्यापैकी गायी, म्हशी, आणि याक यांची संख्या सुमारे ३० कोटी ३१ लाख आहे. उर्वरित पशुधनामध्ये डुकरे, घोडे, मेंढ्या, शेळ्या इत्यादींचा समावेश होतो.

चराऊ जमिनींच्या वापरातील बदल, जमिनीची धूप इत्यादी कारणांबरोबरच आक्रमक तणांमुळेही चराऊ जमिनींचे मोठे नुकसान होत आहे. अनेक तणांमुळे चराऊ कुरणांची उत्पादकता ९० टक्क्यांपर्यंत नष्ट होत आहे.

हिमाचल प्रदेशाचे उदाहरण घेतले तर तेथील एकूण ५५ लाख ६७ हजार हेक्टर क्षेत्रफळापैकी सुमारे १५ लाख ११ हजार हेक्टर क्षेत्र चराऊ कुरणांचे आहे. त्यापैकी समुद्रसपाटीपासून ६००० फूट उंचीपेक्षा कमी असलेल्या प्रदेशातील चराऊ कुरणांपैकी सुमारे ८० टक्के क्षेत्र तणांच्या विळख्यात सापडून अनुत्पादक झाले आहे.

२०२० च्या पशुगणनेनुसार हिमाचल प्रदेशात ४४ लाख १३ हजार पशुधन आहे.२०१२ च्या तुलनेत ही संख्या कमी झाली आहे. याचे प्रमुख कारण लोकांचा पशुपालनाकडे कमी होत चाललेला कल आहे.पशुधनासाठी चाऱ्याची उपलब्धता पाहिली तर राज्यात हिरव्या चाऱ्याची २०.३० टक्के, तर कोरड्या चाऱ्याची ५३.६१ टक्के कमतरता आहे. ही कमतरता भरून काढण्यासाठी पशुपालक पंजाब आणि हरियाणामधून गहू व तांदळाचा भुसा आयात करतात. हा भुसा येथे पोहोचेपर्यंत त्याची किंमत किलोला १० ते १५ रुपये होते.

इतक्या महागड्या चाऱ्यामुळे पशुपालन तोट्याचा व्यवसाय बनला आहे. त्यामुळे लोक पशुपालनापासून दूर जाऊ लागले आहेत. जनावरे रस्त्यांवर सोडून दिली जात आहेत. त्यामुळे पिकांचे नुकसान होत असून अन्नसुरक्षेलाही मोठा धोका निर्माण झाला आहे.

हिमाचल प्रदेशाच्या सकल देशांतर्गत उत्पादनात पशुपालनाचा २८.८ टक्के वाटा आहे. तरीही पशुपालनाच्या मूलभूत समस्यांकडे पुरेसे लक्ष दिले जात नाही.आपल्या कडेही अशीच अवस्था आहे.पर्वतीय भागात पशुपालन प्रामुख्याने चराईवर अवलंबून होते. चराऊ कुरणांमध्ये पुरेसे गवत उपलब्ध असेल तर पशुपालनासाठी लागणारे श्रम आणि खर्च जवळजवळ निम्म्याने कमी होऊ शकतात.

गोठ्यात बांधून, तेही बाहेरून आणलेल्या महागड्या चाऱ्यावर पशुपालन करणे अत्यंत खर्चिक ठरते. पशुपालनाला प्रोत्साहन देण्यासाठी सरकारने दुधाच्या खरेदीदरात वाढ करण्यासारखी काही पावले उचलली आहेत. परंतु खरी आणि मूलभूत समस्या चाऱ्याची आहे, आणि तिच्याकडे पुरेसे लक्ष दिले जात नाही.चराऊ जमिनींच्या व्यवस्थापनाची समस्या आहे.

दुर्दैवाने, सर्व चराऊ जमिनींचे व्यवस्थापन वन विभागाच्या अखत्यारीत आहे. मात्र चराऊ कुरणांचे व्यवस्थापन हे वन विभागाच्या मुख्य कार्ययोजनेचा भागच नाही. त्यांच्या भाषेत या चराऊ जमिनी खराब झालेल्या जमिनींच्या वर्गात मोडतात.प्रत्यक्षात चराऊ कुरणांकडे पडीक किंवा निरुपयोगी जमीन म्हणून नव्हे, तर उत्पादक प्रक्रियेचा महत्त्वाचा भाग म्हणून पाहिले पाहिजे. जर एखाद्या चराऊ जमिनीची गवत उत्पादन करण्याची क्षमता कमी झाली असेल, तर तिला कमी उत्पादक चराऊ जमीन म्हणता येईल; मात्र तिला पडीक म्हणणे योग्य नाही. .परंतु पशुपालन विभागाकडे चराऊ जमिनींचे नियंत्रणच नाही आणि त्यांच्या सुधारणेसाठी स्वतंत्र अर्थसंकल्पही नाही.

अशा प्रकारे चराऊ जमीन ही कोणत्याही विभागाची जबाबदारीच राहिलेली नाही. वन विभागाने यापूर्वीच अनेक ठिकाणी या जमिनींवर रद्दी झाडांची लागवड केली आहे. त्यांच्या योजने मध्ये आजही चराऊ कुरणांच्या विकासासाठी स्वतंत्र क्षेत्र नाही.म्हणजेच, ज्यांच्या उपजीविकेचा आधार चराऊ कुरणे आहेत, त्या पशुपालकांसाठी आवश्यक असलेल्या या जमिनींच्या संरक्षणाची आणि विकासाची जबाबदारी कोणत्याही एका विभागाने स्वीकारलेली दिसत नाही. कोणतेही प्रत्यक्ष, यशस्वी मॉडेल फारसे पाहायला मिळालेले नाही.पुरेसा अनुभव, तंत्रज्ञान आणि चाऱ्यांच्या बियाण्यांची उपलब्धता आहे. पणगरज आहे ती राज्य सरकारने याकडे योग्य लक्ष देऊन कुरणे विकासाला प्राधान्य द्यावे, त्यासाठी अर्थसंकल्पीय तरतूद करावी आणि योग्य व्यवस्थापन व्यवस्था निर्माण करावी.कुरण आणि पशु चारा वर्ष या उपक्रमाच्या माध्यमातून या दिशेने करण्यात आलेली ही सुरुवात सकारात्मक ठरू शकते.

## एच.आर.पटेल महा.त पीएनजीसीतर्फे मार्गदर्शन

शिरपूर, दि.१२- एच. आर. पटेल आर्ट्स अँड सायन्स कॉलेजमध्ये बीसीए च्या विद्यार्थ्यांसाठी मफ्यूचर टेक्नॉलॉजीज अँड करिअर अपॉर्च्युनिटीज म या विषयावर विशेष सत्र आयोजित करण्यात आले होते. प्राणमय नेक्सजेन करिअर (पीएनजीसी) तर्फे राजगोपाल भंडारी हॉल मध्ये पार पडलेल्या या कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली.

या प्रसंगी प्रभारी प्राचार्य डॉ. गजानन पाटील, बीसीए विभागप्रमुख प्रा. योगेश देसले, आयक्यूएसी समन्वयक डॉ. राहुल सनेर, पीएनजीसी संस्थापक मिस पूनम शालेसा आणि प्लेसमेंट हेड सौरभ कुमार उपस्थित होते. प्राचार्य डॉ. गजानन पाटील यांच्या हस्ते पाहुण्यांचा सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. गजानन पाटील यांनी केले, तर सत्राची पार्श्वभूमी बीसीए विभागप्रमुख प्रा. योगेश देसले यांनी मांडली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक आणि कर्मचाऱ्यांची उपस्थिती व मोलाचे सहकार्य लाभले.

सत्राच्या पहिल्या भागात पूनम शालेसा यांनी विद्यार्थ्यांना कौशल्य विकासाचे महत्त्व सांगत प्रेरित केले. त्यानंतर मुख्य मार्गदर्शक सौरभ कुमार यांनी विद्यार्थ्यांना आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय), जनरेटिव्ह एआय, डेटा सायन्स, क्लाउड कम्प्युटिंग, सायबर सेक्युरिटी आणि डेव्हऑप्स यांसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती देऊन पीएनजीसीच्या प्लेसमेंट ट्रेनिंग प्रोग्रामची ओळख करून दिली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व समारोप सहाय्यक प्लेसमेंट अधिकारी रोशनी कुवर यांनी केले. आभार प्रा. हर्षदा राजपूत यांनी मानले.

## आर.सी. पटेल आश्रमशाळेत आदिवासी संस्कृतीचा जागर

शिरपूर, दि.१२(प्रतिनिधी)- तालुक्यातील असली येथील आर. सी. पटेल प्राथमिक व माध्यमिक अनुदानित आश्रमशाळेत जागतिक आदिवासी दिवस मोठ्या उत्साहात, पारंपरिक वातावरणात आणि विविध सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डी. एस. पावरा होते. मुख्याध्यापक बी. एन. पेंढारकर, जे. पी. मोते, पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे नियोजन सांस्कृतिक प्रमुख डॉ. भावना पाटील यांनी केले. जागतिक आदिवासी दिनानिमित्त विद्यार्थ्यांनी आदिवासी लोकनृत्य, पारंपरिक वेशभूषा, लोककला आणि विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून उपस्थितांची मने जिंकली.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शिक्षक मनोज महाले, आर.एन.पाटील, प्रशांत कोळी, विशाखा शिरसाठ, गायत्री शिंदे, अधीक्षक अमोल पाठक, अधीक्षिका ज्योती सोनवणे, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी प्रयतक केले.

## राष्ट्रध्वजाची विरोधकांकडून तिरंगा यात्रा झेंड्याचे प्रेम स्वागतार्हच- हर्षवर्धन सपकाळ

**मुंबई, दि.१२- भारतीय जनता पक्षाची पितृसंस्था राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने आपला राष्ट्रध्वज तिरंगा झेंड्याला अनेक वर्ष विरोध केला. ते तिरंग्याला अपशकूनी मानत होते, स्वातंत्र्य चळवळीत त्यांचा काहीही सहभाग नव्हता तसेच स्वातंत्र्यानंतर - वर्ष आरएसएसने तिरंगा झेंडा आपल्या कार्यालयावर फडकवलाही नाही, आज त्यांना तिरंग्याचे प्रेम वाटत असेल तर हे स्वागतार्हच आहे, देर आये दुरुस्त आये, पण यामागे भाजपा व आरएसएसचा काही कावा नसावा, असा हल्लाबोल महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला आहे.**

टिळक भवन येथे काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या अध्यक्षतेखाली काँग्रेस पक्षाच्या कोअर कमिटीचे एक महत्वपूर्ण बैठक संपन्न झाली. या बैठकीला विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे नेते विजय वडेट्टीवार, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, काँग्रेस वर्किंग कमीटीचे सदस्य बाळासाहेब थोरात, नसीम खान, माजी प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, माजी मंत्री डॉ. नितीन राऊत, यशोमती ठाकूर, प्रदेश काँग्रेसचे वरिष्ठ उपाध्यक्ष मोहन जोशी, प्रदेश सरचिटणीस अभिजीत सपकाळ उपस्थित होते. या बैठकीत संघटनात्मक आढावा घेण्यात आला तसेच राज्यातील राजकीय, सामाजिक व इतर महत्वाच्या प्रश्नांवर तसेच रणनितीवरही चर्चा करण्यात आली. यापुढे दर महिन्याला अशाच पद्धतीने बैठक घेतली जाणार आहे. या बैठकीत वरही चर्चा करण्यात आली. काँग्रेस पक्षाने आतापर्यंत हजार बीएलए नियुक्त केले आहेत तर बीएलए- सुद्धा नियुक्त केले आहेत.



यावेळी प्रसार माध्यमांशी बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ पुढे म्हणाले की, भारतीय जनता पक्षाचे सरकार सर्व पातळ्यांवर अपयशी ठरले असून सरकारमध्ये भ्रष्टाचार मोठ्या प्रमाणात बोकाळला आहे, महागाई वाढली आहे, शेतकऱ्यांचे प्रश्न आहेत, बेरोजगारीचा प्रश्न आहे, कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न आहे पण सरकार त्याकडे लक्ष देत नाही. जनतेच्या प्रश्नांवरून लक्ष दुसरीकडे वळवण्यासाठी जातीपातीच्या व धर्माच्या नावावर द्वेष पसरवला जात आहे. फोडा आणि राज्य करा या नितीप्रमाणे भाजपाचे काम सुरु आहे. परंतु भाजपा महायुती सरकारचा हा डाव काँग्रेस हाणून पाडेल व जनतेच्या प्रश्नावर सरकारला जाब विचारण्यासाठी आंदोलनात्मक भूमिका घेईल, असे सपकाळ यांनी सांगितले.

**भाजपाचे आंदोलन हास्यास्पद**

झारखंड मधील विद्यार्थी आंदोलनासंदर्भात भारतीय जनता पक्षाच्या खासदारांनी संसद परिसरात आंदोलन केले यावर विचारलेल्या प्रश्नावर काँग्रेस प्रदेशाध्यक्ष म्हणाले की, भाजपाचे हे आंदोलन हास्यापद आहे. दिल्लीत जंतरमंतरवर व देशभर पेपरफुटीच्या प्रश्नावर तरुणांनी मोठे आंदोलन केले असता त्यांच्यावर अमानुष पद्धतीने लाठीहल्ला केला, पॅलेट गन चालवल्या गेल्या, शेकडो विद्यार्थ्यांवर गुन्हे दाखल केले, मुलींना अत्यंत वाईट वागणूक दिली, त्यावेळीच भाजपाच्या खासदारांनी असे आंदोलन करायला हवे होते. काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी झारंखडच्या विद्यार्थी आंदोलनावर केलेला लाठीहल्ला चुकीचाच आहे, असे स्पष्ट केले आहे, असेही हर्षवर्धन सपकाळ म्हणाले.

**नरेंद्र मोदी व अमित शाह हेच पळपुटे**

पत्रकारांच्या प्रश्नाला उत्तर देताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष म्हणाले की, राहुल गांधी हे पळणारे नेते नाहीत तर लढणारे नेते आहेत. विद्यार्थ्यांवर लाठीहल्ला केला त्यावर संसदेत चर्चा करण्याची मागणी विरोधी पक्ष सातत्याने करत आहे पण चर्चेत भाग घेण्यास पंतप्रधान नरेंद्र मोदी व केंद्रीय गृहमंत्री अमित शाह घाबरत आहेत. वर्षात एकही पत्रकार परिषद न घेणारे पंतप्रधान व चर्चे पासून पळ काढणारे अमित शाह हेच खरे पळपुटे आहेत. राहुल गांधींना पळ काढणारे म्हणणाऱ्या खासदार अशोक चव्हाण यांनीच वस्तुस्थितीला सामारे जाण्याऐवजी काँग्रेस पक्षातून पळ काढला, असा टोला हर्षवर्धन सपकाळ यांनी लगावला.




## हस्ती ग्रुप ऑफ स्कूलमध्ये विद्यार्थी, शिक्षक पालकांसाठी कार्यशाळा संपन्न

**दोंडाईचा, दि.१२ (प्रतिनिधी)- हस्ती चॅरिटेबल ट्रस्ट संचलित हस्ती पब्लिक स्कूल व ज्यु. कॉलेज, हस्ती वर्ल्ड स्कूल आणि हस्ती गुरुकुल दाऊळ शिवार येथील संयुक्त विद्यमाने विद्यार्थी, शिक्षक व पालकांसाठी विशेष प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. हस्ती ग्रुप ऑफ स्कूलचे चेअरमन कैलास जैन यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या या कार्यशाळेत बारामती येथील शिक्षण तज्ज्ञ दत्तात्रय सुनंदा पांडुरंग कदम यांनी प्रमुख प्रशिक्षक म्हणून मार्गदर्शन केले. यावेळी प्राचार्या रझिया दाऊदी, मुख्याध्यापक सदाशिव महाजन, मुख्याध्यापिका स्मिता साठे, प्रशासकीय अधिकारी रेखा गाडेकर यांच्यासह सर्व समन्वयक व शिक्षक उपस्थित होते.**

या कार्यशाळेत विद्यार्थ्यांसाठी ममाझे पालक, माझे भविष्यफ या विषयावर मार्गदर्शन करताना दररोजचा अभ्यास, शिस्त, स्वतः ची निर्णय क्षमता, आत्मविश्वास आणि स्पष्ट विचार हेच यशाचे खरे मानक असल्याचे सांगत अभ्यास उशिरावर ढकलणे टाळण्याचा सल्ला देण्यात आला. यानंतर शिक्षकांसाठी घेतलेल्या सर्वांगीण विकास या सत्रात विद्यार्थ्यांचा बोधात्मक व भावनिक विकास साधणे, त्यांना मानसिकदृष्ट्या मजबूत बनवणे आणि प्रत्येक विद्यार्थ्यांमधील सुप्त गुण ओळखण्यावर भर देण्यात आला. तसेच पालकांसाठी मआनंदी पालकत्वफ या विषयावर मार्गदर्शन करताना मोबाईलचे दुष्परिणाम व त्यावरील उपाय, मुलांमधील एकाग्रता वाढवणे, त्यांच्या वर्तणुकीमागील समस्या समजून घेणे यावर प्रकाश टाकत ध्यानाचे (मेडिटेशन) महत्त्व पटवून देण्यात आले.

यावेळी शिक्षक प्रशिक्षक भाग्यश्री कराड यांनी विद्यार्थ्यांचे ममिड ब्रेन क्टिव्हफ करण्याचे प्रात्यक्षिक दाखवले. सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संगणक शिक्षक स्वप्नील माळी, पंकज पाटील आणि संगीत शिक्षक मनोज बिरारी यांनी परिश्रम घेतले.

## गुणवंतांचा सन्मान म्हणजे त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप- डॉ.सचिन ढोले यांचे मत

**धुळे, दि.११- विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक यशाचा गौरव करणे ही केवळ कौतुकाची बाब नसून त्यांच्या पुढील वाटचालीला प्रेरणा देणारे महत्त्वाचे पाऊल आहे, गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव केल्याने त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण होतो. तसेच इतर विद्यार्थ्यांनाही अधिक चांगली कामगिरी करण्याची प्रेरणा मिळते. समाजातील विद्यार्थ्यांनी शिक्षणाला प्राधान्य देऊन विविध क्षेत्रांत यश संपादन करावे, यासाठी अशा उपक्रमांची गरज आहे. गुणवंतांचा सन्मान ही समाजाची जबाबदारी असून त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप देणे आवश्यक आहे. या गुणगौरव सोहळ्यामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीला निश्चितच चालना मिळेल. भविष्यातही विद्यार्थ्यांच्या प्रोत्साहनासाठी असे उपक्रम सातत्याने राबविण्यात यावेत, अशी अपेक्षा डॉ.सचिन ढोले यांनी व्यक्त केली.**

भोई समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कामगिरीला प्रोत्साहन देण्यासाठी भोई समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा तिसरा गुणगौरव सोहळा शहरातील कृष्णा लॉन्स आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान डॉ. सचिन ढोले यांनी भुषविले.

अखिल महाराष्ट्र भोई समाज सेवा संघ, पुणे शाखा-धुळे तसेच आदर्श भोई समाज सेवाभावी संस्था, महाराष्ट्र प्रदेश यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या दहावी (एस.एस.सी.) व बारावी (एच.एस.सी.) परीक्षेत ७५ टक्के व त्यापेक्षा अधिक गुण मिळवून उत्तीर्ण झालेल्या समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा या सोहळ्यात गौरव करण्यात आला .

समाजातील विद्यार्थ्यांनी शिक्षणाच्या क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन करावे, त्यांच्यामध्ये स्पर्धात्मक वृत्ती निर्माण व्हावी तसेच इतर विद्यार्थ्यांनाही शैक्षणिक प्रगतीसाठी प्रेरणा मिळावी, या उद्देशाने गेल्या तीन वर्षांपासून गुणगौरव सोहळ्याचे आयोजन जिल्हाध्यक्ष कृष्णा रामचंद्र फुलपगारे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात येत आहे.

या कार्यक्रमा प्रसंगी अखिल महाराष्ट्र भोई समाज सेवा संघाचे अध्यक्ष श्री. कृष्णा (किशन) रामचंद्र फुलपगारे, विजय तानाजी जाधव, साहेबराव तुळशीराम फुलपगारे, माजी नगरसेवक नंदलाल तुळशीराम फुलपगारे, डॉ. एच एम मोरे, समाज सारथीचे संपादक ब ना फुलपगारे, नारायण फुलपगारे, देविदास ढोले, रामकृष्ण सुका मोरे, सिताराम फुलपगारे आदी उपस्थित होते.


## डॉ.आंबेडकर समाज.महा.त आदिवासी दिनी अभिवादन




**धुळे, दि.१२- समता शिक्षण संस्था पुणे संचालित डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाजकार्य महाविद्यालय मोराणे,धुळे येथे ९ ऑगस्ट २०२६ रविवार रोजी सकाळी ठीक ९.३० वाजता जागतिक आदिवासी दिनानिमित्त आदिवासी क्रांतिकारक बिरसा मुंडा, तंट्या भिल्ल, आदिवासी समाजाची कुलदैवत मोगरा माता यांना अभिवादन करण्यात आले.**

याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.विष्णू गुंजाळ यांचे हस्ते मास्वे संघटनेने सूचित केल्यानुसार समाजकार्य पंधरवडा या कार्यक्रमाचे उद्घाटन सुध्दा करण्यात आले.यावेळी प्राचार्य डॉ.गुंजाळ यांनी आदिवासी क्रांतिकारक तसेच मास्वे संघटनेने महाराष्ट्रातील सर्व समाजकार्य महाविद्यालयातील प्राध्यापक व सर्व शिक्षकत्तेर कर्मचारी वर्गासाठी तसेच विद्यार्थ्यांसाठी केलेल्या कामाची माहिती दिली.तसेच समाजकार्य पंधरवड्यात आयोजित कार्यक्रमांची माहितीही दिली आणि या पंधरवड्यात घेण्यात येणा-या सर्व कार्यक्रमात सर्वांनी सक्रिय सहभाग घ्यावा असे आवाहन केले. समाजकार्य पंधरवड्याचे उद्घाटन झाल्याची घोषणा केली. सुत्र संचालन व आभार प्रदर्शन प्रा.डॉ.रघुनाथ महाजन यांनी केले. डॉ.शामसिंग वळवी,डॉ.निंबाळकर ,डॉ.महाजन यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले.

### प्रकाश में आज गुलाम




अमिर खान राणी मुखर्जी शरद सखेसना दिपक तिजोरी दिलीपप ताहील आशुतोज राणा मधुमल्होत्रा

TO BOOK TICKETS SCAN THE QR
ज्योती सिनेमा 3D JYOTI
DOLBY DIGITAL PLUS




ता. ७ से रोज ३ खेल टा. १२ ,६ ,९ बजे
है जवानी तो इश्क होना है
book my show
9422789999/9823177599 Jyoticinemadhule.

TO BOOK TICKETS SCAN THE QR
ज्योती सिनेमा 3D JYOTI
DOLBY DIGITAL PLUS




ता. ७ से रोज १ खेल टा. ३ बजे
भूतम भयम (मराठी)
book my show
9422789999/9823177599 Jyoticinemadhule.

### शब्दकोडे क्रमांक : २४३१

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | २ | | ■ | ३ | | ४ | ■ | ५ | | ६ |
| | ■ | | ■ | ७ | | ■ | ८ | ९ | | ■ | |
| ■ | १० | | ११ | ■ | १२ | | ■ | | ■ | १३ | |
| १४ | | ■ | १५ | १६ | | ■ | १७ | | १८ | | ■ |
| ■ | १९ | २० | ■ | | ■ | २१ | | ■ | २२ | | |
| २३ | ■ | २४ | | ■ | २५ | | | २६ | ■ | | ■ |
| २७ | | | ■ | २८ | | ■ | २९ | | ३० | ■ | ३१ |
| | ■ | ३२ | ३३ | ■ | ३४ | | ■ | ३५ | | ३६ | ■ |
| ■ | ३७ | ■ | ३८ | ३९ | | ■ | ४० | | ■ | ४१ | |
| ४२ | ■ | ४३ | | | ■ | ४४ | | ■ | ४५ | | ■ |
| ४६ | ४७ | | ■ | ४८ | | ■ | ४९ | ५० | ■ | ५१ | ५२ |
| ■ | ५३ | | | | ■ | ५४ | | | | ■ | |

**आडवे शब्द :** १. पंढरीची पायी यात्रा करणारा विठ्ठल भक्त ३.महाराष्ट्रातील प्रसिद्ध खंडोबा देवाचे मुख्य देवस्थान असलेले ठिकाण ५.मुंबईला पाणीपुरवठा करणारे ठाणे जिल्ह्यातील एक प्रसिद्ध धरण ७.'स्त्री' किंवा 'महिला' या अर्थी वापरला जाणारा शब्द ८.'रात्र' किंवा 'निशा' या शब्दाचा सुंदर समानार्थी शब्द १०.कापड आणि हिऱ्यांच्या व्यापारासाठी प्रसिद्ध असलेले गुजरातमधील शहर १२.बंदिस्त, उघड्याच्या विरुद्ध किंवा संप १३.प्रतिबंध करणे १४. विश्वासघात, फसवणूक किंवा फटका १५.दोन पक्षांमधील वाद मिटवण्यासाठी नेमलेली मध्यस्थ व्यक्ती किंवा न्यायालय १७.निवडणुकीत किंवा एखाद्या विषयात जनतेने दिलेला कौल/मत १९. 'गाजा **' एक शब्द २१. एका प्रसिद्ध राशीचे नाव, किंवा वजन करण्याचे साधन २२. स्वतःचा प्रभाव, चमक किंवा रुबाब दाखवणे याअर्थी एक हिंदी शब्द २४.समूह २५. महर्षी व्यास यांचे पिता असलेले एक प्रसिद्ध प्राचीन ऋषी २७. मेंढीचे लहान पिल्लू २८. घराच्या उंबरठ्यावर किंवा दरवाजापाशी २९.एका प्रसिद्ध शास्त्रीय संगीत रागाचे नाव, किंवा आशियातील एक देश ३१.मी-विरुद्ध ३२.हिंदीत-केव्हा ३४. चुकीचा ३५. लोणी या शब्दासाठी वापरला जाणारा हिंदी किंवा काव्यमयी शब्द ३७.एक खेळ 'खो *' ३८. लहान मुलगा, किंवा अविवाहित तरुण मुलगा ४०. घेतलेली प्रतिज्ञा, अट, किंवा 'परंतु' ४१. डोक्याच्या केसांमधील पाडलेली ओळ, किंवा एक अंमली वनस्पती ४३. चुलीमध्ये जाळण्यासाठी वापरले जाणारे लाकूडफाटा किंवा इंधन ४४. शेवट, मरण किंवा मृत्यू ४५. शरीर, देह किंवा अवयव ४६. सर्व, संपूर्ण, किंवा निखिल ४८. स्वतःच्या देशातील, स्वदेशी ४९. जमिनीतून आपोआप उडणारा किंवा वाहणारा पाण्याचा नैसर्गिक स्रोत ५३. दुष्ट बुद्धीचा, गुंड किंवा लफंगा माणूस ५४. मुख्य रस्ता सोडून जाणारी आडबाजूची किंवा निर्जन वाट **उभे शब्द :** १. आषाढी-कार्तिकीला पंढरपूरला जाणारी यात्रा २. दोन व्यक्ती किंवा संस्थांमध्ये झालेला कायदेशीर समझोता/कागदपत्र ४. एक मुलीचे नाव ६. दोन संघांमधील स्पर्धा ९. दोन व्यक्तींची होणारी भेट, किंवा एकत्र येणे १०. गुन्ह्याचा छडा लावण्यासाठी मिळालेला माग, पत्ता किंवा पुरावा ११. पृष्ठभाग, किंवा जमिनीचा खालचा भाग १३.हेतू १६. रस्ता किंवा मार्ग या अर्थी वापरला जाणारा शब्द पाण्याचा साठा असलेली नैसर्गिक जागा ,ठिकाण १८.मला २०.दक्ष २१.कोंबड्याच्या डोक्यावर असतो तो २३.निसर्गाची वक्रदृष्टी२५.कुटुंब २६. लिन ३०. हाताच्या बोटांवरील कडक आवरण ३३.एक सुवासिक फुल ३६.रात्री चांदण्यांच्या प्रकाशहत न्हाऊन निघालेले आभाळ ३९.माणगंगा नदीच्या खोऱ्यात वसलेला प्रदेश ४०.हिंदीत-पानगळ ४२.वर्तुळाच्या एकटोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत मध्यातून गेलेली रेष ४३.वेगवान ४७.बक-उलट लिहा ५०.पोपट ५२.शांत

### शब्दकोडे क्रमांक : २४३० चे उत्तर

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पा | व | सा | ळा | ■ | स | दा | स | र्व | दा | ■ | मा |
| ल | हा | न | ■ | आ | म | दा | र | ■ | वो | ट | र |
| क | ण | ■ | क | मी | ज | ■ | स | मा | स | ■ | वा |
| त्व | ■ | मि | र | र | ■ | वा | री | स | ■ | घ | डी |
| ■ | मे | ला | ■ | खा | स | ■ | त | ■ | बो | र | ■ |
| मे | ■ | व | ज | न | ■ | व | ■ | ना | क | ■ | का |
| ■ | म | ट | र | ■ | स | द | न | ■ | ड | हा | ळी |
| छं | द | ■ | ब | ल | वा | न | ■ | फि | ■ | व | ■ |
| ■ | म | नी | ■ | ग | ल | ■ | वा | र | सा | ■ | मु |
| अ | स्त | ■ | मो | ट | ■ | खो | टी | ■ | ह | ल | का |
| वी | ■ | रा | ही | ■ | भो | क | ■ | रा | स | ■ | द |
| ट | न | ■ | नी | ट | ■ | ला | व | णी | ■ | ह | म |

पान १ वरुन

## आयोगाने शिंदेंना लाभ दिला

मूलभूत कायदेशीर चूक आहे. शिवसेनेतील पक्षप्रमुख, राष्ट्रीय कार्यकारिणी व उपनेते ही पदे निवडणुकीद्वारे ठरत असल्याने पक्षाची रचना लोकशाहीवादीच होती. सर्व उपनेते नियुक्त असल्याचे आयोगाने म्हटले. परंतु प्रत्यक्षात अनेक उपनेते निवडून आलेले होते. शिवसेनेने वेळोवेळी पाठवलेली माहिती व घटनात्मक कागदपत्रे आयोगाने नीट तपासलीच नाहीत. जर २०१८ चा दस्तऐवज बनावट असल्याचा दावा होता, तर आयोगाने त्याची स्वतंत्र चौकशी का केली नाही, असा प्रश्न सिब्बल यांनी उपस्थित केला.

संघटनात्मक बहुमत ठाकरे गटाकडे असल्यानेच २०१८ ची घटना बाजूला सारण्यात आली. शिंदे गटाकडे चार लाख तर ठाकरे गटाकडे एकोणावीस लाख प्राथमिक सदस्यांचे प्रचंड समर्थन होते. शिंदे यांनी मुख्यमंत्रीपदाचा प्रभाव वापरून नंतर वाढवलेल्या संख्याबळाचा वापर मुळ फूट सिद्ध करण्यासाठी करता येणार नाही. शिंदे यांची मुख्यमंत्रीपदावरील नियुक्तीच बेकायदेशीर असल्याने त्या स्थितीत मिळालेला पाठिंबा ग्राह्य धरता येत नाही. पक्षाचे पदाधिकारी व लाखो सदस्यांकडे दुर्लक्ष करून केवळ आमदारांच्या आकड्यांवरच जोर देण्यात आला. शिवसेना अलोकशाहीवादी पद्धतीने चालते हे सिद्ध करणारा कोणताही पुरावा आयोगाकडे नव्हता. दहाव्या अनुसूचीनुसार बंडखोर आमदारांच्या अपात्रतेचा निर्णय आधी होणे आवश्यक होते. हा पायंडा मान्य केला तर भविष्यात कोणतेही सरकार पाडले जाईल व आमदार मुळ पक्षावरच दरोडा टाकतील. पक्षात फूट पडण्याआधी दहाव्या अनुसूचीनुसार आमदारांच्या अपात्रतेची कारवाई पूर्ण होणे बंधनकारक होते, या सिब्बल यांच्या मुद्द्यावर खंडपीठाने गंभीर दखल घेतली आहे.

## जेन अल्फाच्या प्रश्नांचे उत्तर द्यावे लागेल!

जागरूकतेकडे लक्ष वेधले आहे. त्यांनी पोस्टमध्ये राज्यातील चार प्रमुख उदाहरणे दिली आहेत. त्यामध्ये नाशिक (त्र्यंबकेश्वर–पेगलवाडी, गोहिरेवाडी) येथील विद्यार्थ्यांनी पाण्याच्या बाटलीचा माईक बनवून रस्त्यांच्या दुरवस्थेचे अनोख्या पद्धतीने रिपोर्टिंग केली आहे. तर दुसऱ्या उदाहरणामध्ये रायगड (कोंडिवडे) येथील दोन विद्यार्थिनींनीही नाशिकच्या विद्यार्थ्यांप्रमाणेच प्रयोग करून गावातील रस्त्यांचे प्रश्न मांडले. तिसऱ्या घटनेत नागपूर (ग्रामीण) येथे शाळेत जाण्यासाठी एस.टी. बस सुरू करा, अशी आक्रमक मागणी करत विद्यार्थिनी थेट पुढे आल्या आहेत. हिंगोली (वसमत) येथे विद्यार्थ्यांनी आमचा सत्कार करण्यापेक्षा आम्हाला शाळेत शिक्षक द्या, असे हिंगोलीच्या शिक्षणाधिकाऱ्यांना ठणकावून सांगणाऱ्या मुलींनी व्यवस्थेचे वाभाडे काढले आहेत.

आंदोलने नाहीत, नवी जनजागृती

या घटनांचा संदर्भ देत विजय वडेट्टीवार म्हणाले की, ही केवळ मुलांची छोटी–मोठी आंदोलने नाहीत, तर ही नव्या पिढीची जागृती आहे. या जेन अल्फा पिढीला ट्रोलिंग नको, हिंदू–मुस्लिम द्वेष नको, धमक्या आणि दंडेलशाही नको आहे. त्यांना चांगले रस्ते, शाळेत शिक्षक हवेत, सुरक्षित प्रवास हवा, दर्जेदार शिक्षण आणि मूलभूत सुविधा हव्या आहेत.

द्वेषाचे नाही, विकासाचे राजकारण करा

सरकारला थेट इशारा देताना विजय वडेट्टीवार म्हणाले की, सरकारने आता ठरवावे की त्यांना खऱ्या मुद्द्यांवर बोलायचे आहे की मुद्दे टाळण्यासाठी समाजाला केवळ भावनिक वादात अडकवून ठेवायचे आहे? कारण, ही पिढी आता प्रश्न विचारायला शिकली आहे. ती सत्तेकडे उत्तर मागत आहे. जर या मुलांच्या प्रश्नांकडे आता दुर्लक्ष केले, तर उद्या हीच पिढी मतपेटीतून सरसकट उत्तर देईल, असा इशाराही त्यांनी दिला. द्वेषाच्या राजकारणापेक्षा विकासाचे राजकारण करा. या मुलांना गृहीत धरू नका. त्यांच्या शिक्षणाकडे आणि नागरी सुविधांकडे लक्ष द्या, असा सल्ला ही विजय वडेट्टीवार यांनी राज्य सरकारला दिला आहे.

## भरती परीक्षा पद्धतीत..

उभारण्यात याव्यात, असेही निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी दिले. या विविध परीक्षांमध्ये जिल्हाधिकारी, पोलीस आयुक्त, पोलीस अधीक्षक, शिक्षण विभागाचे वरिष्ठ अधिकारी यांचीही समन्वय भूमिका, इतर विविध देशांमधील परीक्षा पद्धती, विद्यमान प्रक्रिया आणि त्यातील विविध संभाव्य सुधारणा अशा अनेक विषयांवर यावेळी सांगोपांग चर्चा झाली. राज्याचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल आणि इतर वरिष्ठ अधिकारी या बैठकीला उपस्थित होते.

## गॅस ई-केवायसीच्या अंतिम तारखेमुळे..

मुदत वाढवून नागरिकांना पुरेसा वेळ देण्यात यावा. प्रशासन, गॅस एजन्सी आणि डिजिटल माध्यमांद्वारे सोप्या भाषेत मार्गदर्शन करण्यात यावे. एजन्सींवरील गर्दी कमी करण्यासाठी अतिरिक्त काउंटर सुरू करावेत आणि ऑनलाईन/ऑफलाईन पर्याय उपलब्ध करून द्यावेत. या निवेदनाची गांभीर्याने दखल घेऊन तातडीने आदेश निर्गमित करावेत. अशी मागणी माजी नगरसेवक अमीन पटेल, अबुलास खान, राजेंद्र खैरनार, असलम अन्सारी, किशोर वाळके, खलीन अन्सारी, आसीफ अन्सारी, आसीफ मसालेवाले यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

## डोकारे साखर कारखाना..

सहकारी साखर कारखाना बंद असल्याने शेतकरी, ऊसतोड कामगार आणि कारखान्यावर अवलंबून असलेल्या विविध घटकांवर परिणाम होत असल्याचा दावा आयोजकांनी केला आहे. कारखाना पुन्हा सुरू करण्यासाठी ठोस भूमिका घेऊन पुढील आंदोलनाची दिशा या बैठकीत निश्चित करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले. कारखाना सुरू करण्याच्या मागणीसाठी सर्वांनी एकत्र येऊन आपल्या हक्कांसाठी आवाज उठवावा, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे. बैठकीत कारखान्याच्या सद्यस्थितीबाबत चर्चा करून पुढील कृती आराखडा ठरविण्यात येणार आहे.

## वीज पुरवठ्याचा प्रश्न सुटणार

सुवर्ण नगर, विकास फीडर, मांगूशेठ नगर, गौरीनंदन, कुलकर्णी हॉस्पिटल, वेद कन्स्ट्रक्शन, द्वारका नगर, हरिओम नगर, स्वामीनारायण मंदिर, मोतीलाल गॅरेज, गोशिया नगर आणि कुबेर नगर अशा १९ ठिकाणी डीपींवर प्रचंड ताण असल्याचे निदर्शनास आले आहे. नागरिकांच्या तक्रारी आणि ओव्हरलोड डीपींची माहिती तपासून पुढील महिन्याभरात १० ठिकाणी नवीन अतिरिक्त डीपी बसवण्याची कार्यवाही केली जाईल. यामध्ये विकास हायस्कूल, सौभाग्य मंगल कार्यालय, डॉ. कुलकर्णी हॉस्पिटल, स्वामीनारायण मंदिर, द्वारकाधीश नगर, नितीन नगर, कुबेर नगर, सदाशिव नगर, गौरीनंदन आणि मिशन बंगला या परिसरांचा समावेश आहे. तसेच डॉ. बी. डी. पाटील यांच्या हॉस्पिटलला वेगळ्या लाईनने जोडण्याचेही निश्चित करण्यात आले आहे.शहादेकरांना भविष्यात अखंडित वीज मिळण्यासाठी दोन महत्त्वाच्या ३३ केव्ही उपकेंद्रांचे काम हाती घेण्यात आले आहे.यांत ३३ केव्ही सेंटर (मनरद) याचे मक्तेदार निश्चित झाले असून जुन्या ३३ केव्ही सेंटरजवळील जागा ताब्यात घेण्याची प्रक्रिया सुरू आहे.३३ केव्ही सेंटर (मोहिदा) या उपकेंद्राचे काम वेगाने सुरू असून ते फेब्रुवारी २०२७ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे.ही दोन्ही उपकेंद्र पूर्ण झाल्यानंतर शहादा शहरातील वारंवार खंडित होणाऱ्या विजेची समस्या पूर्णपणे निकाली निघेल.

महावितरणचे कार्यकारी अभियंता प्रसाद आणि उपअभियंता पुष्पेन्द्र पाडवी यांनी या समस्येची गंभीर दखल घेत अत्यंत सकारात्मक भूमिका घेतली आहे. त्यांनी प्रस्तावित केलेल्या उपाययोजनांमुळे शहादावासीयांना मोठा दिलासा मिळणार आहे. ठरलेली आणि राहिलेली कामे वेळेत पूर्ण झाल्यास महावितरणचे हे अधिकारी निश्चितच शहादेकरांच्या अभिनंदनास पात्र ठरणार आहेत अशी माहिती डॉ.कांतीलाल टाटिया यांनी दिली आहे.

पान १ वरुन

## प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश

तसेच महानगरपालिकेच्या उपलब्ध जागेवर निवासी गृहप्रकल्प उभारण्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याबाबत प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

यामुळे सुशीनाला परिसरातील बाधित कुटुंबांना आता शासनाच्या माध्यमातून कायमस्वरूपी निवाऱ्याची आशा निर्माण झाली आहे. विशेष म्हणजे, केवळ मागणी किंवा आश्वासनापुरता विषय न राहता शासनाच्या गृहनिर्माण विभागाकडून अधिकृतपणे प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश देण्यात आल्याने पुनर्वसनाच्या प्रक्रियेला प्रशासकीय गती मिळाली आहे.

खासदार डॉ. बच्छाव यांनी या प्रश्नाचा सातत्याने शासन स्तरावर पाठपुरावा करताना बाधित कुटुंबांना केवळ तात्पुरता आधार न देता त्यांना सन्मानाने जगण्यासाठी कायमस्वरूपी घर मिळावे, अशी भूमिका घेतली होती. त्यांच्या मागणीची दखल घेत उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांनी संबंधित विभागाला आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानंतर आता गृहनिर्माण विभागाने धुळे महानगरपालिकेला थेट प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश दिल्याने या पाठपुराव्याला ठोस प्रशासकीय स्वरूप प्राप्त झाले आहे.

सुशीनाला परिसरातील बाधित कुटुंबांना हक्काचे आणि सन्मानाचे घर मिळावे, हा आपला सातत्यपूर्ण प्रयतक आहे. शासनाच्या गृहनिर्माण विभागाने प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश दिल्याने पुनर्वसनाच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल पडले आहे. पुढील कार्यवाहीसाठीही शासन स्तरावर सातत्याने पाठपुरावा केला जाईल, अशी भूमिका खासदार डॉ. शोभाताई बच्छाव यांनी व्यक्त केली. सुशीनाला परिसरातील बाधित कुटुंबांच्या पुनर्वसनासाठी खासदार डॉ. बच्छाव यांच्या पाठपुराव्याला उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांची साथ आणि आता गृहनिर्माण विभागाची अधिकृत कार्यवाही मिळाल्याने बाधित कुटुंबांना हक्काचे घर या दिशेने मोठे पाऊल पडले असून, नागरिकांमध्ये समाधानाचे आणि आशेचे वातावरण निर्माण झाले आहे.

## वाघाडी फाट्यावर ट्रकची धडक

(वय ३२, रा. जामपारी, ता. सेंधवा, जि. बडवाणी) हे दोघे सध्या वैजापूर (जि. छत्रपती संभाजीनगर) येथील उकडगाव येथे शेतमजुरीचे काम करत होते. दि. १० ऑगस्ट रोजी सायंकाळी ७वाजेच्या सुमारास दोघेही आपल्या ताब्यातील हिरो डिलक्स मोटारसायकलने क्र.एमपी १०/एक्सई– ९५९६ उकडगाव येथून आपल्या मूळ गावी जामपारी येथे जाण्यासाठी निघाले होते. दि. ११ ऑगस्ट रोजी रात्री सुमारे ३ वाजेच्या सुमारास सोनगीर शिवारातील वाघाडी फाट्याजवळ रस्त्याचे काम सुरू असलेल्या ठिकाणी मागून येणाऱ्या अज्ञात मालट्रक चालकाने आपल्या ताब्यातील वाहन भरधाव वेगात, हयगयीने आणि बेदरकारपणे चालवून त्यांच्या मोटारसायकलला जोरदार धडक दिली. या धडकेमुळे दोघेही रस्त्याच्या कडेला असलेल्या खड्ड्यात फेकले गेले. अपघातानंतर धडक देणारा ट्रक चालक न थांबता घटनास्थळावरून पसार झाला.या अपघातात गुजराल चौधरी यांच्या कपाळावर गंभीर दुखापत झाल्याने, तर शिवलाल आर्या यांच्या उजव्या हाता–पायाला जबर मार लागल्याने दोघेही घटनास्थळीच बेशुद्ध पडले. सकाळी ९ वाजेच्या सुमारास शुद्धीवर आल्यानंतर मोबाईलवर संपर्क साधून त्यांनी अपघाताची माहिती नातेवाइकांना दिली. माहिती मिळताच उकडगाव येथून मालक व नातेवाइकांनी घटनास्थळी धाव घेत दोघांना तातडीने सोनगीर ग्रामीण रुग्णालयात दाखल केले.मात्र, वैद्यकीय अधिकारी डॉ. रमाकांत शर्मा यांनी तपासून गुजराल वजला चौधरी यांना मृत घोषित केले. तर अपघातात शिवलाल आर्या यांच्या उजव्या हातास फ्रॅक्चर झाले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

## तीन विद्यार्थिनींच्या मृत्यूची जबाबदारी..

आदिवासी विकासाचा निधी इतर विभागांकडे वळविला जात असल्याने आश्रमशाळांमध्ये आवश्यक त्या सुविधा उपलब्ध होत नसल्याचेही निवेदनात म्हटले आहे.

तसेच केंद्रीय स्वयंपाकगृहाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना निकृष्ट दर्जाचे भोजन दिले जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. केंद्रीय किचन बंद करण्याची मागणी आदिवासी संघटनांनी यापूर्वीही केली असून, त्याकडे शासनाने दुर्लक्ष केल्याचे निवेदनात नमूद आहे. विद्यार्थ्यांच्या आरोग्य व सुरक्षेच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष करून केवळ ठेकेदारांचे पोषण केले जात असल्याचा गंभीर आरोपही करण्यात आला आहे.

आदिवासी विकास विभागासह शासनाच्या विविध विभागांमध्ये आदिवासींसाठी राखीव असलेल्या जागांवर अद्याप भरती झालेली नाही. या प्रश्नावरही आदिवासी विकास मंत्र्यांकडून ठोस निर्णय घेतला जात नसल्याची नाराजी व्यक्त करण्यात आली आहे.

तीन निष्पाप विद्यार्थिनींच्या मृत्यूला जबाबदार असलेल्या यंत्रणेवर कठोर कारवाई करावी, आश्रमशाळांमधील सर्व असुविधा तातडीने दूर कराव्यात, विद्यार्थ्यांना सुरक्षित व दर्जेदार सुविधा द्याव्यात आणि या संपूर्ण प्रकरणाची नैतिक जबाबदारी स्वीकारून आदिवासी विकास मंत्री अशोक उईके यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. मागण्यांवर तातडीने निर्णय न झाल्यास संपूर्ण महाराष्ट्रात आदिवासी समाजाच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे.यावेळी अखिल महाराष्ट्र आदिवासी विद्यार्थी संघटना जिल्हाध्यक्ष आर सी गावीत,कॉंग्रेसचे तालुका अध्यक्ष जालमसिंग गावीत,कांतीलाल गावीत, अनिल गावीत,वेच्या गावीत,किशन गावीत,समुवेल गावीत,संजय मावची,योसेफ पाडवी आदीच्या सह्या निवेदनावर आहेत.

## अतिरिक्त तुकडीचा प्रस्ताव नाकारला प्रस्तावानुसार मान्यता द्या; कोर्टाचे निर्देश

**सोनगीर, दि. १२ (सोनगीर)– येथील बहुजन शिक्षण प्रसारक मंडळ संचलित कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या नवीन पदव्युत्तर अभ्यासक्रमांना मान्यता नाकारण्याचा राज्य सरकारचा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठाने रद्द केला आहे.**

महाविद्यालयाने शैक्षणिक वर्ष २०२६–२७ पासून एम.एस्सी. (कॉम्प्युटर सायन्स) हा नवीन अभ्यासक्रम तसेच एम.एस्सी. (ऑर्गेनिक केमिस्ट्री) ची अतिरिक्त तुकडी सुरू करण्यासाठी प्रस्ताव सादर केला होता. या प्रस्तावावर विद्यापीठाच्या तज्ज्ञ समितीने महाविद्यालयाची प्रत्यक्ष पाहणी करून आवश्यक सर्व पायाभूत सुविधा उपलब्ध असल्याचे नमूद करत शासनाकडे अनुकूल शिफारस केली होती. मात्र, शासनाने सर्व बाबींकडे दुर्लक्ष करत १५ जुलै २०२६ रोजी हा प्रस्ताव फेटाळला होता. शासनाच्या या निर्णयाविरोधात संस्थेने उच्च न्यायालयात धाव घेतली. संस्थेच्या वतीने ॲड. मोहित श्रीकांत शाह यांनी प्रभावी युक्तिवाद करत विद्यापीठाची सकारात्मक शिफारस आणि महाविद्यालयातील सोयी–सुविधा विचारात न घेता शासनाने चुकीच्या पद्धतीने प्रस्ताव नाकारल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले. न्यायमूर्ती नितीन बी. सूर्यवंशी व न्या. आबासाहेब डी. शिंदे यांच्या खंडपीठाने याचिकाकर्त्यांचा युक्तिवाद ग्राह्य धरत शासनाने अतितांत्रिक कारणास्तव हा प्रस्ताव नाकारल्याचे स्पष्ट निरीक्षण नोंदवले. न्यायालयाने शासनाचा १५ जुलै २०२६ रोजीचा नकार आदेश रद्द करून प्रस्तावानुसार मान्यता देण्याचे निर्देश दिले असून, विद्यार्थ्यांना संस्थास्तरावर प्रवेश देण्यासही परवानगी दिली आहे. या निर्णयामुळे शासनाच्या मनमानी कारभाराला चाप बसला असून ॲड. मोहित श्रीकांत शाह यांच्या न्यायालयीन प्रयत्नांना मोठे यश मिळाले आहे.

## डी.जे.मुक्त गणेशोत्सव साजरा करा; सपोनि.देवरेंचे बैठकीत आवाहन

**सोनगीर दि. १२(प्रतिनिधी)– आगामी गणेशोत्सव शांततेत, सौहार्दपूर्ण वातावरणात आणि मुख्य म्हणजे डी. जे. मुक्त पद्धतीने साजरा करण्यासाठी धुळे जिल्हा पोलीस प्रमुखांनी दिलेल्या मार्गदर्शक सूचनांचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन सोनगीर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक तुषार देवरे यांनी केले आहे. सोनगीर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सर्व गावातील गणेश मंडळांच्या पदाधिकाऱ्यांची बैठक नुकतीच पार पडली. या बैठकीच्या अध्यक्षतेवरून बोलताना देवरे यांनी आगामी गणेशोत्सवादरम्यान डी. जे.चा वापर टाळून कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस प्रशासनाला सहकार्य करण्याचे निर्देश उपस्थित पदाधिकाऱ्यांना दिले.**

दरम्यान, येत्या १४ ते २५ सप्टेंबर २०२६ या कालावधीत गणेशोत्सव साजरा होणार आहे. या पार्श्वभूमीवर धुळे जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक यांच्या प्रमुख उपस्थितीत पोलीस अधीक्षक कार्यालयातील मंथन हॉल येथे जिल्ह्यातील सर्व सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांचे अध्यक्ष, पदाधिकारी तसेच डी.जे. चालक व मालक संघटनेची महत्त्वाची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत जिल्हा पोलीस अधीक्षकांनी गणेशोत्सव काळात सर्व यंत्रणांनी व नागरिकांनी पालन करावयाच्या प्रमुख मार्गदर्शक सूचना जाहीर केल्या आहेत.

जिल्हा पोलीस प्रशासनाने दिलेल्या सूचनांनुसार, आगामी उत्सव पूर्णपणे डी.जे. मुक्त साजरा करणे अनिवार्य राहील. नियमांचे उल्लंघन करून डी. जे. वाजवताना आढळल्यास संबंधितांवर मा. न्यायालयाच्या ध्वनिप्रदूषणाबाबतच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार कडक कायदेशीर कारवाई केली जाईल. तसेच गावात सामाजिक सलोखा आणि शांतता टिकून राहण्यासाठी एक गाव एक गणपती ही संकल्पना मोठ्या प्रमाणावर राबवण्याचे आवाहन करण्यात आले आहे. सर्व सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी महापालिका, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि पोलीस प्रशासनाकडून आवश्यक ती पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक राहील.सुरक्षेच्या दृष्टीने प्रत्येक सार्वजनिक गणेश मंडळाकरिता एका पोलीस अंमलदाराची नियुक्ती करण्यात येणार असून, हे अंमलदार मंडळाच्या पदाधिकाऱ्यांशी थेट संपर्कात राहून अडीअडचणींचे निवारण करतील. तसेच सर्व गणेश मंडळांनी मंडप परिसरात सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसवावेत आणि स्थानिक पोलिसांच्या मदतीने पोलीस मित्र स्वयंसेवकांची मदत घ्यावी. मंडप किंवा कमानी उभारताना वाहतुकीस अडथळा होणार नाही आणि ॲम्बुलन्स तसेच अग्निशामक दलासारख्या आपत्कालीन वाहनांना ये–जा करण्यासाठी पुरेशी जागा सोडली जाईल, याची दक्षता मंडळांनी घ्यावी. देखावे किंवा आरास सादर करताना दोन धर्म किंवा समाजांमध्ये तेढ निर्माण होणार नाही आणि देखावे पाहण्यासाठी येणाऱ्या नागरिकांच्या सुरक्षेसाठी, विशेषतः महिलांच्या सुरक्षेसाठी स्वतंत्र रांगेची व्यवस्था करावी.याशिवाय, प्रिंटिंग प्रेस धारकांसाठीही कडक सूचना देण्यात आल्या असून त्यांनी दोन समाज, पक्ष किंवा व्यक्तींमध्ये तंटा निर्माण होईल असा कोणताही आक्षेपार्ह मजकूर असलेले फ्लेक्स किंवा बॅनर छापू नयेत. फ्लेक्स व बॅनरच्या खालच्या बाजूला मुद्रकाचे नाव आणि मोबाईल क्रमांक छापण्याचे निर्देशही पोलीस प्रशासनाकडून देण्यात आले आहेत.

## स्व. पप्पाजी शांतीलालजी जैन जयंती गुणवंत विद्यार्थ्यांना पारितोषिक वितरण




**दोंडाईचा,दि.१२– हस्ती चॅरिटेबल ट्रस्ट संचलीत, हस्ती पब्लिक स्कूल अँड ज्यु. कॉलेज व हस्ती वर्ल्ड स्कूल आणि हस्ती गुरूकुल दोंडाईचा तर्फे दि.१० ऑगष्ट २०२६ सोमवार रोजी दृढधर्मी व दानशूर व्यक्तिमत्व स्व. पप्पाजी शांतीलालजी हस्तीमलजी जैन यांच्या ८५ व्या. जयंती निमित्ताने विद्यार्थ्यांसाठी सन २०२५–२६ या शैक्षणिक वर्षाचा पारितोषिक वितरणाचा दिमाखदार सोहळा हस्ती ग्रुप ऑफ स्कूलचे चेअरमन कैलास जैन यांचे मार्गदर्शनाने उत्साहात संपन्न झाला.**

सदर सोहळ्याच्या सुरूवातीला स्व. पप्पाजी शांतीलालजी जैन यांचे प्रतिमेचे पूजन करून; त्यांच्या पावन स्मृतीस विनम्र अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी सन्माननीय मम्मीजी लीलावतीजी शांतीलालजी जैन, काकीजी चंद्रावतीजी कांतीलालजी जैन, शालेय व्यवस्थापन सदस्या सुषमाजी जैन, शितलजी जैन, तसेच हस्ती स्कूल शालेय संचालक सदस्य या सोबतच प्राचार्या रझिया दाऊदी, प्राचार्य जीवन सपकाळे, मुख्याध्यापक सदाशिव महाजन व हस्ती पब्लिक स्कूल येथे बोर्ड ऑफ डायरेक्टर खुर्शीदभाई कादियानी, मुकेश निहाणी, दीपक बोधवानी, दिनेश भामरे, पि टी ए सदस्य मनीषा वाघ, दिपाली गिरासे, प्रमोद बागल, जितेंद्र बोरसे, महेंद्र वाघ, शितल पाटील, सुरेखा माळी तर हस्ती वर्ल्ड स्कूल येथे पि टी ए सदस्य सोनाली ठोंबरे, पूजा अग्रवाल, आरती अग्रवाल, दिपाली नागरे, ॲड. सान्वी जयसिंघानिया, माधुरी गोसावी, प्रशांत ठोंबरे, व हस्ती गुरुकुल येथे मधुकर अहिरराव, सुनिल माळी, सुरेखा पाटील, स्मिता पाटील, दिव्या सनेर, अर्चना गिरासे हे मान्यवर उपस्थित होते.

**पाहिजेत**

टायपिस्ट म्हणून मुलगा/ मुलगी पाहिजेत. इच्छुकांनी सायंकाळी ६ वाजता समक्ष भेटावे.
अनुभवी व्यक्तीस प्राधान्य
श्रीविनायक डायग्नोस्टीक सेंटर
हॉटेल गणपती पॅलेस समोर, मालेगाव रोड, धुळे

**पाहिजेत**

सलुन कामासाठी कारागीर पाहिजेत
समक्ष भेटा
सुपर पार्लर
दत्त मंदिर चौक देवपूर, धुळे
-: संपर्क :-
8806594213

**शेती विकणे आहे**

खाते नं. २०१, भुमापन व उपविभाग क्र. ६३३/१ बोअरिंग १, सौर उर्जा बसविले आहे. : १ एकर खामगाव रोड इंग्लीश मेडियमचे पाठी मागे नंदुरबार
: संपर्क :
बिंदीया रमेश साळवे
7066559455
9422288948

**पाहिजे**

ऑफिस कामासाठी
Video Editor व Computer Operator पाहिजे
-: संपर्क :-
7666176855
अभय कॉलेज रोड, राम नगर, धुळे

**विकणे आहे**

वलवाडी गोंदुर रोड दुकान फर्निचर पीओपीसह विकणे आहे. व भोकर शिवारात विमानतळ फाटा सर्व्हे नं.९/१/२ मधील प्लॉट विकणे आहे.
9011894666

**पाहिजेत**

यश दाताच्या दवाखान्यात काम करण्यासाठी पुर्णवेळ/अर्धवेळ कंपाउंडर पाहिजे
६ वी गल्ली H.D.F.C. बँकेच्या समोरील गल्लीत
भेटण्याची वेळ दुपारी १२॥ ते २
संध्या. ६॥ ते ८

**फ्लॅट भाड्याने देणे**

2 BHK फ्लॅट व 1 BHK फ्लॅट भाड्याने देणे आहे.
इंडियन बँकच्या वरती जुनी मर्चंट बँक शेजारी ग.नं.६, धुळे.
-: संपर्क :-
9823074633

**पाहिजेत**

- नर्स (ANM GNM)
- R.M.O
- रिसेप्शनिस्ट
- B.Sc.ऑप्टोमेट्रीस्ट

संपर्क
यशोदा हॉस्पिटल व नेत्रालय
दत्त मंदीर देवपूर, धुळे
मो. ८३२९२४९३८६

**ब्राम्हण पाहिजे**

मंदिराच्या दैनंदिन पूजेसाठी ब्राम्हण पाहिजे,
वेळ सकाळी ६ ते १२, सायं. ४ ते ८
भेटण्याची वेळ सायं. ५ ते ६
-: संपर्क :-
श्री. जलाराम मंदिर
नटराज टॉकीज मागे, धुळे

**पाहिजेत**

रेडीमेड कापड दुकानासाठी हुशार व अनुभवी सेल्समन/ हेल्पर पाहिजेत.
आकर्षक पगार व इतर सवलती दिल्या जातील.
अपोलो गारमेन्ट
गरुड मैदान कॉम्प्लेक्स, साक्रीरोड, धुळे
7498748799

**पाहिजेत**

1) Helper - 3
2) Office Boy- 2
3) Electrician - 2
4) Project Manager-1
-:संपर्क:-
चैतन्य टेलिकॉम
गरुड कॉम्प्लेक्स, कमलाबाई शाळेसमोर, साक्री रोड, धुळे.
9225606888

**दुकान विकणे आहे**

मुख्य बाजारपेठ मधील गल्ली नं.४ येथील बालाजी मंदिरासमोर क्षेत्र (१०.०१) चौ.मी दुकान योग्य किंमतीत विकणे आहे.
– संपर्क –
8830291946

५९ वर्षांपासुन धुळेकरांच्या विश्वासाला पात्र ठरलेले...
Authorised Dealer
Godrej
LG Life's Good
सर्व आधुनिक व लेटेस्ट मॉडेल
JAPAN PREMIUM



0% फायनान्सची सुलभ E.M.I सुविधा उपलब्ध.
BAJAJ FINSERV
HDB FINANCIAL SERVICES
*नियम व अटी लागू
श्री महावीर इलेक्ट्रीक अँण्ड टी.व्ही.
श्रीराम मंदिराजवळ, फुलवाला चौक, आग्रा रोड, धुळे, फोनः (02562) 229162, 235763

हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक, हेमंत सुधाकर मदाने यांनी हेमंत प्रिंटींग प्रेस, वीर सावरकर मार्ग, धुळे येथे मुद्रित करुन आपला महाराष्ट्र, जनशक्ती, वीर सावरकर मार्ग, धुळे–४२४००१ येथे प्रकाशित केले. दुरध्वनी मुख्य कार्यालय, धुळे (०२५६२) २३५३९६, २३८३९६, aplamaha@gmail.com नंदुरबार २२३४४४ aplamahashd@gmail.com शहादा–२५६९३९, मालेगाव–२४३१३३६, नाशिक–२५७५९८९, पुणे–९८२३०४६५२२, आपला महाराष्ट्र–रजि.नं.एम.एच.डी.आय.ए.१७ र.नं.११२२२/६०